सत्यमेव जयते
**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**
भूविकास बँक इमारत, दुसरा मजला, क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर, फोन : 0240-2334755, E-mail :djr_agd@rediffmail.com

जा. क्र. प्रशा-३/कलम ७७अ,७८अ/प्रशासक नामतालिका/ 946 /२०२५ दिनांक :- २८ मार्च, २०२५.

**वाचा :-**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. ४-सआ/कायदा व वैधा.कार्य./क.७७अ,७८,७८अ/प्रा.अ./प्र./पॅनलयादी२५-२६/५७/२०२५ दि.२०.२.२०२५.

२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालयीन पत्र जा. क्र. ४-सआ/कायदा व वैधा.कार्य./क.७७अ,७८,७८अ/प्रशा.अधि.नामतालिका/९२/२०२५ दि.१९.३.२०२५.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर, सत्यमेव जयते

**विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणा-या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे नामतालिकेबाबत...**

**प्रस्तावना:-**

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालयाचे संदर्भीय पत्र वाचा क्र.१ या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रान्वये सूचीत केल्यानुसार या कार्यालयाचे स्तरावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांची प्रस्तावित नामतालिकाबाबतचे जाहीर निवेदन दि. २३.२.२०२५ रोजीचे दैनिक पुण्यनगरी, छत्रपती संभाजीनगर या वृत्तपत्रात प्रसिद्ध केले होते. तसेच दि. २४.२.२०२५ ते दि. २८.२.२०२५ पर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज मागविण्यात आले होते. सदरचे कालावधीत एकूण ३२ अर्ज प्राप्त झाले. सदरील अर्जाची या कार्यालयाचे स्तरावर छाननी करणेत आली असून छाननीमध्ये २२ अर्ज पात्र ठरलेले आहेत.

त्यानुसार मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचे वाचा क्र.२ चे पत्रामध्ये सूचीत केल्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) वाचा क्र. २ चे पत्रान्वये आदेशातील नमूद अटी / शर्तीस अधीन राहून दि. १.४.२०२५ ते दि. ३१.३.२०२७ या कालावधीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) पात्र ठरलेल्या व्यक्तींची जाहीर प्रगटनामध्ये दिलेल्या वेळापत्रकानुसार आदेशाद्वारे दि. ३१.३.२०२७ पर्यंत पॅनलवर प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) म्हणून नियुक्ती करणे आवश्यक असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, शरद जरे, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर पॅनलवर प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) निवडीसाठी या कार्यालयास दि. २४.२.२०२५ ते दि. २८.२.२०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील पात्र ठरलेल्या अर्जानुसार एकुण २२ व्यक्तींची खालीलप्रमाणे नमूद अटी / शर्तीस अधीन राहून या आदेशाचे दिनांकापासून दि. ३१.३.२०२७ पर्यंत छत्रपती संभाजीनगर या विभागासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांची पॅनलवर नियूक्ती करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे पॅनल. छत्रपती संभाजीनगर विभाग.**

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | हुद्दा |
|---|---|---|
| १. | राजेंद्र भिकनराव मते, एल ३/१, गुरू जनरल स्टोअरजवळ, विष्णूनगर, आकाशवाणीमागे, छत्रपती संभाजीनगर. | शाखा व्यवस्थापक |
| २. | ॲड. मेघा माणिकराव बडगिरे, फ्लॅट नं. १, श्रीनिवास कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१० व ११, एन एस-३, एन-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| ३. | ॲड.राजु प्रभाकर गुडे, फ्लॅट नं.१, श्रीनिवास कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१० व ११, एन एस-३, एन-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| ४. | निकीता गंगाधर पिंपळे, रो. हा. नं. ५/२५/३४, खोकडपुरा, वरद अपार्टमेंटजवळ, छत्रपती संभाजीनगर. | अंशकालीन कर्मचारी |
| ५. | दिलीप देवीलाल जैस्वाल, प्लॉट नं. १७, राजेसंभाजी कॉलनी, सर्व्हे नं. १५, जळगावरोड, छत्रपती संभाजीनगर. | सेवानिवृत्त सहकार अधिकारी, श्रेणी-१ |
| ६. | ॲड. अविनाश रमेश नजन, मु. पो. सिध्दनाथ वाडगाव, लासूर रोड, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| ७. | गिरिष गणपतराव खिस्ते, सुभद्रा अपार्टमेंट, उल्कानगरी, ओंकारेश्वर चौक, छत्रपती संभाजीनगर. | प्रमाणीत लेखापरिक्षक |
| ८. | मधुकर छोटूजी कुंटे, फ्लॅट नं. १३४, बिल्डिंग नं. १८, म्हाडा, तिसगाव, छत्रपती संभाजीनगर. | सेवानिवृत्त व्यवस्थापक, भूविकास बँक |
| ९ | विक्की अशोक भारूका, कैलासनगर, गल्ली नं.५, भारूका निवास, घर क्र. ए-४, छत्रपती संभाजीनगर. | प्रमाणीत लेखापरिक्षक |
| १० | संजय दत्तात्रय वाणी, रा. ई-११/३, मयुरनगर, हडको, छत्रपती संभाजीनगर. | प्रमाणीत लेखापरिक्षक |
| ११ | गोपाल मुरलीधर राठोड, ४/१८/२१/३, राम मंदीर, कैलासनगर, बग्गा इंटरनॅशनल हॉटेलमागे, छत्रपती संभाजीनगर. | प्रमाणीत लेखापरिक्षक |
| १२ | सुनील राजेश वर्मा, प्लॉट ११५, आकाश अपार्ट्मेंट, श्रेयनगर, छत्रपती संभाजीनगर. | सनदी लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| १३ | आकाश रमेश लताड, प्लॉट नं. ५२, गल्ली नं. ३, अंबीकानगर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर. | टॅक्स कन्सल्टंट |
| १४ | ॲड. गौतम जनार्धन पहिलवान, सदनिका क्र. बी-२, वरूण इन्क्लेव्ह, सातारापरिसर, छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| १५ | गणेश ओंकार वर्मा, प्लॉट ९, गट नं.४, मार्तंडनगर, सातारा परिसर, एमआयटी कॉलेज रोड, छ.संभाजीनगर. | सनदी लेखापाल |
| १६ | रामकिसन गोरखनाथ मांडोळे, प्लॉट २०८, राजीव गांधीनगर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर. | प्रमाणीत लेखापरिक्षक |
| १७ | ॲड. ज्ञानेश्वर माणिकराव वाघ, रो. हा. क्र. ए-११, रायगड निवास, मोरयापार्क, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| १८ | ॲड. विजयालक्ष्मी मोतीलाल बरेलीकर,घर नं. १४, श्रीराम अपार्टमेंट, अजबनगर, क्रांतीचौक, छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| १९ | ॲड. विष्णू बाळासाहेब पवार, रा.कडेठाण बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| २० | ॲड. सागर गजानन जवरे, रा. प्लॉट नं. १८५, समर्थनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| २१ | ॲड. अजीम रहिम शेख, रा. अगर कानडगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |
| २२ | ॲड. जगन पुंजाजी खंदारे,आदर्श कॉलेजरोड, अंतुलेनगर, बळसोंड, ता.जि. हिंगोली. | प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेट |

**अटी व शर्ती :-**

१. सदर पॅनलवरील नियुक्त प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ व नियम, १९६१ मधील तरतुदींचे तथा शासनाचे व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना व परिपत्रकांचे काटेकोरपणे तंतोतंत पालन करावे.

२. सहकारी संस्थांच्या निबंधकाने प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे आदेश काढल्यास त्याची प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ, ७८अ व नियम, १९६१ मधील तरतुदीनुसार विहीत पद्धतीचा अवलंब करून प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे कामकाज विहीत मुदतीतच करून संबंधित निबंधकाकडे सादर करावा.

३. प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे सदरील पॅनल हे **दि. ३१ मार्च, २०२७ पर्यंत** वैध राहील.

४. प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांनी फी ची रास्त मागणी ही संबंधित सहकारी संस्थेच्या निबंधकाकडे करावी. प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे फी संदर्भात संस्थेचे निबंधक निर्णय घेतील. तसेच या प्रकरणी शासनाकडून अथवा मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडून आदेश, निर्देश, परिपत्रकीय सूचना प्राप्त झाल्यास त्यांनुसार निबंधकाने योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे.

५. या प्रकरणी शासनाकडून अथवा या कार्यालयाकडून प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) फी संदर्भात कोणत्याही प्रकारची हमी घेतली जाणार नाही याची प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांनी कृपया नोंद घ्यावी.

६. नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे कामकाज समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे नाव सदर पॅनलवरून कमी करण्यात येईल. तसेच सदर प्रकरणी अहवाल मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास सादर करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. सदर पॅनलवरील प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांनी मुदतीच्या आतच प्रकरणाची प्रक्रिया पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी, किती संस्थांवर प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) म्हणून नेमणूक केली आहे? किती संस्थांचे प्रशासकीय कामकाज पूर्ण केले आहे? व किती संस्थांचे प्रशासकीय कामकाज प्रलंबित आहे? याबाबतचा संस्थानिहाय सद्यस्थिती अहवाल संस्थेच्या निबंधकाकडे व या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

८. सदर पॅनलवरील प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) त्यांचेकडे दिलेल्या प्रकरणात कोणी मा. न्यायालयाकडे / शासनाकडे / सक्षम प्राधिकरणाकडे अपील याचिका दाखल केली असल्यास त्याबाबतच्या सद्यस्थितीची थोडक्यात टिप्पणी संबंधित सहकारी संस्थेच्या निबंधकाकडे वेळोवळी सादर करणे बंधनकारक राहील.

९. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचे वेळोवेळी प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे संदर्भात पारीत केलेले परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन त्या सोबतच्या विहीत नमुन्यात अहवाल / संक्षिप्त माहिती संबंधित निबंधकाकडे व या कार्यालयास सादर करावी.

( शरद जरे )
**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर.**

**प्रति,**
श्री / श्रीमती ------------------------------------
प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांना त्यांचे पत्त्यावर.

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी तथा अंमलबजावणीसाठी रवाना.**
१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर / जालना / परभणी / हिंगोली.
२. उप / सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.------------- सर्व
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), छत्रपती संभाजीनगर यांना समादराने.

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर.**
१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर. सत्यमेव जयते

**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर.**